॥ सबका मालिक आत्मा ॥

# दीपावली निमित्त

# मंगलमय शुभेच्छा!



ध्यान म्हणजे निःशब्द ज्ञानाचा अभ्यास

निःशब्द ज्ञान म्हणजे आत्मज्ञान

आत्मचिंतनाद्वारे
विश्वशांतीचा संदेश देणारे मासिक

॥ॐ गुरुदेव॥

# आत्मा मालिक

ऑक्टोबर - २०२५

॥ सबका मालिक आत्मा ॥



# ॥ अमृतवाणी ॥

या जगात एकच सत्य आहे आणि ते म्हणजे आत्मा. जगातील सर्व वस्तू नष्ट होतील, सृष्टीत असंख्य घडामोडी होतील, पण आत्मा हा चिरकाल टिकेल. कारण त्याला आदिही नाही आणि अंतही नाही. अनादि कालापासून आत्मतत्त्व चालत आलेले आहे आणि अनंतकाळापर्यंत असेच चालत राहील. कारण तो अमर आहे. सर्व देवांच्या उत्पत्तीपूर्वी आत्मा अस्तित्वात होता म्हणून आपण आत्म्याची पूजा केली पाहिजे. आत्म्यावर प्रेम केले पाहिजे. तसेच क्षणभर केलेले आत्मचिंतन कितीतरी श्रेष्ठ आहे. आत्म्याची पुजा केल्यास ती सर्व देवांची पूजा होते.

ईश्वरप्राप्तीचा सर्वात साधा, सोपा आणि सहज मार्ग म्हणजे आत्मचिंतन. कारण ईश्वर आत्म्याच्या स्वरुपात प्रत्येकाच्या, हृदयात बसलेला आहे. नुसतं रुपाला न पाहता 'स्व-रुपाला' पहा आणि ईश्वर प्राप्ती करुन घ्या.

आत्मा हा निर्गुण आणि निराकार आहे. त्याला पाहण्यासाठी कोणत्यातरी सगुण साकार रुपाची आवश्यकता असते. म्हणून कोणत्याही आकारात निराकाराचे ध्यान करावे. सद्‌गुरुचे आत्मरुपात ध्यान करा. आत्म्याला जात, धर्म नसतो. हिंदू, मुस्लिम, शीख, पारसी सर्वांना आत्मचिंतनाने ईश्वरप्राप्ती होते. भगवान श्रीकृष्ण, येशुख्रिस्त, मोहंमद पैगंबर, गुरूनानक, भगवान महावीर, भगवान गौतम बुध्द या सगळ्यांनी आत्म्याची ओळख करुन घेऊन त्याचे चिंतन केले म्हणूनच ते ईश्वररुप झाले.

॥ आत्मा मालिक ॥

''आत्मचिंतनाद्वारे विश्वशांतीचा संदेश देणारे मासिक''

# मासिक ॐ गुरुदेव

वर्ष २४ वे अंक १० वा ऑक्टोबर २०२५ ● RNI-MAHMAR/2001/4853

**संस्थापक संपादक**

हृदयनिवासी संत सच्चिदानंद महाराज
हृदयनिवासी संत देवानंद महाराज

**संपादक**

संत परमानंद महाराज
मो. ९५९५९७०२२०, ९९२२०७०२२०

**संपादकीय सल्लागार**

श्री. नंदकुमार सूर्यवंशी
श्री. भगवान दौंड
श्री. हनुमंत भोंगळे

**मार्गदर्शक**

संत निजानंद महाराज
संत विवेकानंद महाराज

**आत्मा मालिक ध्यानपीठ**

दीपक टिळेकर, मो. ८३८००३९३०५
सुखदेव मोरे, मो. ७०५८०५९६६१

**प्रसादालय विभाग (अखंड अन्नदान छत्र)**

श्री. प्रकाश भट, मो. ८६०५४६४५५५
श्री. बाळासाहेब गोर्डे, मो. ७५८८६९४०७४
श्री. प्रकाश गिरमे, मो. ९८५०३३८०५५

**धर्मशाळा (निवास व्यवस्था)**

विलास गायकवाड,
मो. ९९२२१७४२११

संपादकीय - उजळूया आत्मज्योती - संत परमानंद महाराज ४

देवडोई भक्तचरण। हे महद्भाग्यलक्षण।। -डॉ. विजय बाणकर ६

'ज्ञान'दीप लावू जगी - नामदेव सदावर्ते १२

दसरा दिवाळी तोचि आम्हां सण -बंडोपंत कुलकर्णी १७

जगद्गुरू तुकोबांची दिवाळी - डॉ. सुनील शिंदे १९

दीपावली सण आनंदाचा -बी. के. गायकवाड २१

दीपावली महापर्व - नरेश यादव २६

या अंकात प्रसिध्द झालेल्या लेखांतील मतांशी संपादक, प.पू. गुरुदेव माऊली, आश्रम संत, पदाधिकारी, मुद्रक आणि प्रकाशक सहमत असतीलच असे नाही. (वादप्रतिवाद कोपरगांव न्यायकक्षेत.)

ॐ गुरुदेव हे मासिक संपादक, मालक व प्रकाशक संत परमानंद महाराज, विश्वात्मक जंगली महाराज आश्रम ट्रस्ट, मु.पो. कोकमठाण यांनी मुद्रक संतोष दत्तात्रय माळी, श्री ग्राफिक्स, गांधीनगर रोड, कोपरगांव, जि. अहिल्यानगर-४२३६०१ येथे मुद्रीत करुन विश्वात्मक जंगली महाराज आश्रम ट्रस्ट, मु.पो.कोकमठाण, ता. कोपरगांव, जि. अहमदनगर-४२३६०१ येथे प्रकाशित केले.

सर्व देवांचा देव आत्मा! आत्मा हा प्रत्येकाच्या हृदयात निवास करतो व तो ध्यानाने प्राप्त होतो.

## उजळूया आत्मज्योती



**संपादकीय**

**दिवाळीत लक्ष्मीपूजन केले जाते. लक्ष्मी म्हणजे समृद्धी. पण लक्ष्मी केवळ पैशांची, दागिन्यांची नसते. ती आहे अंतःकरणातील सात्त्विकता, शुद्धता, विवेक, करुणा आणि श्रद्धा. धनदौलतीच्या मागे धावताना जर आपण ही लक्ष्मी गमावली, तर दिवाळीही केवळ बाह्य सोहळा ठरतो. अध्यात्मात 'दीप' ही प्रतिमा फार गूढ आहे. दीप जळतो तेव्हा स्वतःचा देह अर्पण करतो, वात आणि तेल यांचा त्याग करतो. त्या त्यागातूनच तो प्रकाश देतो. आत्मप्राप्तीची वाटही अशीच असते. 'स्व'चा त्याग केल्याशिवाय आत्मप्रकाश मिळत नाही.**

**-संत परमानंद महाराज**

**'दीपावली'** म्हणजे दिव्यांची मालिका. पण हे दिवे नेमके कुठे लावायचे? फक्त घराच्या अंगणात, गच्चीवर, बाल्कनीत? की अंतःकरणाच्या अंधारलेल्या कोपऱ्यांत? दिवाळीचा खरा अर्थ बाह्य रोषणाईत नव्हे, तर आत्मप्रकाशाच्या दिशेने टाकलेल्या पावलात आहे.

दिवाळी साजरी करताना आपण सर्वप्रथम काय करतो? घराची साफसफाई करतो, कोपरा-कोपरा झाडतो, जळमटे काढतो, जुनी फळकुटं टाकून देतो, भिंती रंगवतो. हे सर्व करताना मनात एक आनंद असतो, नवीन सुरुवात, नव्या प्रकाशाचं स्वागत करण्याचा. पण हा प्रकाश केवळ विजेचा, दिव्याचा, कंदिलाचा असेल तर तो क्षणभंगुर ठरेल. खरी दिवाळी तर तेव्हाच सुरू होते जेव्हा आपण हीच शुद्धी आपल्या अंतरंगात करतो.

बृहदआरण्यकोपनिषदात म्हटले आहे,

**ॐ असतो मा सद्गमय।**
**तमसो मा ज्योतिर्गमय ।**
**मृत्योर्मा अमृतं गमय।**
**ॐ शांति शांति शांति।**

अर्थ : मला असत्याकडून सत्याकडे घेऊन चल, अंधारातून प्रकाशाकडे ने, मृत्यूकडून अमरत्वाकडे घेऊन जा. ही एक आंतरिक आर्तता आहे. हा अंधःकार आहे मोहाचा, द्वेषाचा, अहंकाराचा, अज्ञानाचा. त्यावर उपाय म्हणजे ज्योतिर्गमय अर्थात आत्मज्योतीकडे वाटचाल.

**जाणिवेचा दीप लावा मनःपुरी।**
**हृदयी उजळती ज्ञानज्योती।।**

जाणिवेचा दीप म्हणजे विवेक, सजगता, आत्मपरीक्षण. मनाच्या या चैतन्यपुरीत हे दीप लागले की ते ज्ञानप्रकाश फाकतो. हीच खरी दिवाळी, हीच आत्मप्राप्तीची पहिली पायरी. माणूस केवळ देह नव्हे, तो आत्मा आहे, चैतन्यस्वरूप. पण हा आत्मा, हे स्वरूप आपण विसरतो. आपण 'मी' म्हणून जे काही उराशी बाळगतो, नाव, रूप, कुटुंब, पद, पैसा, प्रतिष्ठा हे सगळं 'अहं'च्या छायेत उभं असतं. दिवाळी हे त्या छायेपासून बाहेर पडण्याचं निमित्त आहे.

**सर्व देवांचा देव आत्मा! आत्मा हा प्रत्येकाच्या हृदयात निवास करतो व तो ध्यानाने प्राप्त होतो.**

'नरक चतुर्दशी' या दिवशी आपण तेल उटणे लावून आंघोळ करतो. पण केवळ शरीरशुद्धी पुरेशी नाही. ही नरकासुर वधाची संकल्पना आपल्याला सांगते की आतल्या विकारांचा, वासनांचा, लोभाचा, अहंकाराचा या सगळ्या नरकासुरांचा वध झाला पाहिजे.

आत्मज्योत पेटवण्यासाठी अज्ञानाचा नाश करावा लागतो. अज्ञान म्हणजे काय, तर आत्म्याचं विस्मरण. आपण खरं कोण आहोत, हेच विसरणं म्हणजे अज्ञान. हेच विस्मरण दूर करणारं तत्त्वज्ञान म्हणजे दिवाळीचा खरा प्रकाश, अर्थात आत्मप्रकाश.

दिवाळीत लक्ष्मीपूजन केले जाते. लक्ष्मी म्हणजे समृद्धी. पण लक्ष्मी केवळ पैशांची, दागिन्यांची नसते. ती आहे अंतःकरणातील सात्त्विकता, शुद्धता, विवेक, करुणा आणि श्रद्धा. हीच खरी लक्ष्मी आहे. धनदौलतीच्या मागे धावताना जर आपण ही लक्ष्मी गमावली, तर दिवाळीही केवळ बाह्य सोहळा ठरतो.

अध्यात्मात 'दीप' ही प्रतिमा फार गूढ आहे. दीप जळतो तेव्हा स्वतःचा देह अर्पण करतो, वात आणि तेल यांचा त्याग करतो. त्या त्यागातूनच तो प्रकाश देतो. आत्मप्राप्तीची वाटही अशीच असते. 'स्व'चा त्याग केल्याशिवाय आत्मप्रकाश मिळत नाही. दिवाळीच्या निमित्ताने आपण नवीन कपडे घेतो. परंतु, आंतरिक जीवनातले वस्त्र काय? मनाचं वस्त्र जर मळलेलं, द्वेषानं काळवंडलेलं असेल, तर नवीन वस्त्रं काय उपयोगाची? दिवाळी म्हणजे हर्षाचा, उत्सवाचा काळ असला तरी तो विरक्तीचाही काळ आहे. कारण खरी दिवाळी सुरू होते ती जेव्हा मन एखाद्या क्षणी शांत बसतं, लाखो दिव्यांच्या गर्दीतही एकांतात डोकावायला सुरुवात करतं.

दीपावलीच्या या पर्वात जो आपल्या अंतरंगात डोकावतो, स्वतःचा शोध घेतो, त्याला कोणीही थांबवू शकत नाही. दिवाळी म्हणजे अशीच एक वेळ, जिथे आपण अंतर्ज्ञानाची वाट धरू शकतो. फटाक्यांचा आवाज, फराळाचा गोडवा, नवीन वस्त्रांचा गंध हे सारे जरी असले, तरीही अंतर्मनात जर दिव्यत्व नसेल, तर दिवाळी अपुरी वाटते.

पृथ्वीवरचा प्रकाश, तेज, यांचा अनुभव साऱ्यांनाच होतो; पण अंतर्यामातील प्रकाश अनुभवण्यासाठी करावे लागते ते ध्यान. दिवाळीची, पाडव्याचा ब्रह्ममुहूर्त अर्थात चैतन्यमय पहाट, हाच क्षण असतो ध्यानाचा, आत्मप्रकाशाच्या स्पर्शाचा.

जेव्हा आपण सर्व काही विसरून फक्त एक खोल श्वास घेतो, डोळे मिटतो, आणि मी कोण आहे? असा प्रश्न विचारतो, तेव्हाच खरी दिवाळी उलगडते. कारण दिवाळी हे एक बाह्य रूप आहे, पण आत्मप्राप्ती ही त्याची अंतर्यात्रा आहे. ज्ञान म्हणजे आत्मज्योती. हीच आत्मप्राप्तीची पहाट. दिवाळी ही त्या पहाटेची आठवण करून देणारा महोत्सव आहे. दिवाळी ही केवळ सण नसून, ती एक साधना आहे. आत्मप्राप्तीच्या मार्गावर चालताना येणाऱ्या अंधाऱ्या वाटांवर लागणारा प्रकाश आहे. ही दीपावली, प्रत्येकाच्या अंतःकरणातला अंधार नाहीसा करून, आत्मज्योती प्रज्वलित करो, हीच प्रार्थना. सर्वांना या प्रकाशपर्वाच्या अनंतकोटी शुभेच्छा.

**||आत्मा मालिक||**

**-संत परमानंद महाराज,**
संपादक

***



## देवडोई भक्तचरण। हे महद्‌भाग्यलक्षण।।

**'आपले पाय नि देवाची डोई' ही उफराटी वाटणारी गोष्ट ज्या भक्ताबाबत घडते त्याचे भाग्य फार मोठे असते. म्हणून दुसरे काही न करतां त्यासाठीचीच बहुमोल साधना करीत रहा, असे ते सांगतात. 'माझे पाय तुझी डोई' असे करताना तू अजिबात संकोच बाळगू नकोस, असे संत तुकाराम महाराज देवाला म्हणतात. ती गोष्ट घडली की ती साध्य करण्यासाठी गिरवावयाचा असतो तो धडा पूर्ण झाला किंवा करावयाचे होते ते आत्मसात झाले, असे निश्चित होते.**

**- डॉ. विजय बाणकर**

**दे**वांचा देव असलेला श्रीविठ्ठल आपल्याला भेटावा म्हणून जे पंधरा दिवस अखंड ध्यान करतात, ज्या देवाच्या भेटीपुढे सृष्टीकार्य करणाऱ्या ब्रह्मदेवादिक मोठमोठ्या देवांचेही पद ज्यांना नको आहे, ज्या देवाची 'थोर भक्ती' घडावी म्हणून जे मुक्तीही नाकारतात, ज्या देवाच्या पायीं जडले गेले की अनंत तीर्थे घडतात, भवसागरतारक असलेल्या ज्या देवचरणांची सेवा साधता यावी म्हणून जे 'पुन्हा जन्म घेईन' असे म्हणतात, ज्या देवाच्या पायीं जडले गेले की बाकी काहीही करावयाचे उरत नाही, मरण आले तरी ज्या देवाचे चरण सोडू नये, ज्या देवाच्या पायांवर डोके ठेवून मी उतराई झालो आहे, ज्या देवाच्या पायाविण मी एक क्षणही वेगळा नसतो, असे आणि 'आतां कोठें धावें मन। तुझे चरण देखिलिया।।' व माझा सर्वभाव तुझ्यापायीं राहील असे प्रेम तू मला दे असे जे ज्या देवाला म्हणतात, ज्या देवाचे मुख पाहणे हेच माझ्यासाठी सर्वसुख असून त्याची ती डोळ्यांची पारणी फिटणारी दिव्य तेजयुक्त मूर्तीच माझे हे डोळे सदा पाहात राहो आणि '...कांही न मागे आणीक। तुझे पायीं सुख सर्व आहे।।', असे जे ज्या देवाला म्हणतात तेच संत श्रीतुकाराम जेव्हा 'माझे पाय तुझी डोई। ऐसें करीं गा भाक देई।।', असेही त्याच आपल्या आराध्य देवाला म्हणतात तेव्हा त्यांना नेमके काय म्हणावयाचे आहे ते समजून घेणे आवश्यक ठरते.

ज्या अभंगात ते 'माझे पाय तुझी डोई' असे करण्याचे देवाकडे वचन मागत आहेत, तो अभंग असा आहे -

**माझे पाय तुझी डोई। ऐसें करीं गा भाक देई।।१।।**
**पाहतां दिसे उफराटे। घडे तईं भाग्य मोठे।।२।।**
**बहु साधन मोलाचे। यासी जोडा दुजे कैचें।।३।।**
**नका अनुमानूं विठ्ठला। तुका म्हणे धडा झाला।।४।।**

'आपले पाय नि देवाची डोई' ही उफराटी वाटणारी गोष्ट ज्या भक्ताबाबत घडते त्याचे भाग्य फार मोठे असते. म्हणून दुसरे काही न करतां त्यासाठीचीच बहुमोल साधना करीत रहा, असे ते सांगतात. 'माझे पाय तुझी डोई' असे करताना तू अजिबात संकोच बाळगू नकोस, असे ते देवाला म्हणतात. ती गोष्ट घडली की ती साध्य करण्यासाठी गिरवावयाचा असतो तो धडा पूर्ण झाला किंवा करावयाचे होते ते आत्मसात झाले, असे निश्चित होते.

'भक्ताचे पाय व देवाची डोई' या उफराट्या वाटणाऱ्या गोष्टीचे स्पष्टीकरण व समर्थन पुढीलप्रमाणे करता येते -

**सर्व देवांचा देव आत्मा! आत्मा हा प्रत्येकाच्या हृदयात निवास करतो व तो ध्यानाने प्राप्त होतो.**

१. 'आपल्या पायापासून ते भुवयींपर्यंतच्या देहभागाला पिंड व भुवयीपासून वर असलेल्या मस्तकरूपी अंडाकृति घुमटाला ब्रह्मांड म्हणतात. आत्मारूपी विठ्ठलदेव ब्रह्मांडांत राहतो तर जीवरूपी भक्त पिंडांत राहतो. मानवदेहरूपी संपुटांत (देहरूपी धातुपात्रांत) सामावलेला देव खरा साहेब नसून सर्व विश्वांत सर्वत्र असलेला देवच माझ्या दृष्टीने खरा साहेब (सर्वकर्ता) आहे, असे संत श्रीकबीर म्हणतात.[१] जीवरूपी भक्ताला आधी देहातील देवस्वरूपाचे, नंतर देवाच्या विश्वरूपाचे ज्ञान होते व त्यानंतर विश्वाहून अनंत पट महान असलेले देवस्वरूप (परब्रह्मस्वरूप) तो पावतो, असे समर्थ श्रीरामदासस्वामी म्हणतात.[२] अर्थात, भक्ताला केवळ दिव्य ज्ञानदृष्टीने दिसू शकणाऱ्या देहस्थ देवमूर्तीहून त्याचे विश्वव्यापी व विश्वातीत स्वरूप महान असते. त्या देवस्वरूपाशी एकरूपता अनुभवणारा जीवरूप भक्तही आपण देहस्थ देवरूपाहून महान (झालो) असल्याचे अनुभवतो. या अर्थाने देहस्थ देवाहूनही तो मोठा होत असतो. देहांत राहणाऱ्या विठ्ठलरूप देवाच्या चरणाजवळ राहण्याची इच्छा असणारा भक्तच विश्वाहून महान असलेल्या देवासमान झालेला असतो. अशा महान भक्ताच्या पायावर देहस्थ देवाने आपली डोई ठेवणे म्हणजे पर्यायाने स्वतःच्या त्या मूळ महान स्वरूपापुढे नतमस्तक होणे होय.

'देव भक्त तूंचि झालासी दोन्ही। वाढावया सुख भक्ति हे जनीं।।', असे म्हणत देव व सद्भक्त हे स्वरूपतः समान असल्याचेही श्रीतुकारामांनी म्हटले आहे.[३] देव व सद्भक्त हे दोन्ही ब्रह्मस्वरूप असतात. अर्थात, सद्भक्ताचे पाय व देवाची डोई या दोन्ही गोष्टी ब्रह्मस्वरूप म्हणून समान असतात. अशा स्वसमान सद्भक्ताला देवाने नमन करणे म्हणजे यापूर्वी म्हटल्याप्रमाणे स्वतःच्याच महान स्वरूपाला नमन करणे होय.

देवाच्या डोईप्रमाणे आपले पायदेखील ब्रह्मस्वरूप म्हणजे तत्त्वतः समान असल्याचे अनुभवास येणे म्हणजे सद्भक्तास आध्यात्मिक समता अनुभवास येणे होय. सर्वोच्च समतेचा हा अनुभव हे त्याचे महद्भाग्यलक्षण असल्याचे 'माझे पाय तुझी डोई' अशा सहजासहजी लक्षात न येणाऱ्या असामान्य शब्दांत श्रीतुकारामांनी व्यक्त केले आहे. देवासमान झालेल्या त्यांनी समोर असलेल्या देवाला 'पाहातोसी काय। आता पुढे करी पाय।।१।।', अशी अधिकारयुक्त विनंतीदेखील केली आहे. नंतर 'बरवें करी सम। नको भंगों देऊ प्रेम।।' असेही त्यांनी देवाला म्हटले आहे. त्रिभुवनांत सर्वत्र देवाचीच पाउले संचली असल्याचे म्हणजे सर्वत्र तो एक देवच असल्याचे त्यांना दिसत होते.[४] सर्वकाही देवरूप म्हणजेच सम असल्याचे ते अखंडितपणें अनुभवत होते. चराचरातील सर्वकाही देवरूपच असल्याचे जिला दिसते तीच खरी समदृष्टी असते. ही खरी समदृष्टी लाभलेले ते विनम्रपणें देवाच्या पाया पडू इच्छितात व त्यासाठीच 'चला पुढती सामोरे' असे श्रीविठ्ठलाला म्हणतात.

त्यांच्या सत्शिष्या संत श्रीबहिणाबाईदेखील त्यांच्याप्रमाणे देवासमान झाल्या होत्या. जसा देव तशा आपणही षड्गुणसंपन्न व सर्वव्यापक असल्याचे त्या अनुभवत होत्या.[५] परंतु, देवाचे ते भूषण आपल्याला सेव्य नव्हे म्हणजे सेवक भक्ताने त्रैलोक्यनायक देवाधिदेवाची जागा घेऊन स्वमाहात्म्य मिरवावयाचे नसते म्हणून व संत करतात ती 'थोर भक्ती' करीत राहण्याबाबतचा कल्याणकारी संदेशच जनतेत कायम रहावा म्हणून आपल्या सद्गुरुंना अनुसरत 'तू देव आणि मी भक्त' हा भाव कायम ठेवून त्यादेखील देवचरणीं लीन होऊन राहिल्या होत्या.[६]

२. संत श्रीजनाबाई यांनी 'देवच खाते देवच पिते। देवावरी मी निजते।।१।।' या अभंगातून जो स्वानुभव व्यक्त केला आहे तो समजून घेताना श्रीतुकोबांच्या 'माझे पाय तुझी डोई' या म्हणण्याचा अर्थ

उमगतो. विश्वातील सर्व पदार्थ मुळात देवरूपच आहेत. अर्थात अन्न, पाणी व भूमी हे सर्व देवरूपच आहे. भूमी हे देवाने धारण केलेले एक रूप आहे. म्हणून, मी भूमीवर निजते म्हणजे देवावरच निजते, असे स्वस्वरूपानुभवयुक्त परम अर्थवाही विधान श्रीजनाबाईंनी केले आहे. त्यांच्यासारखे खरे म्हणजे अविभक्त भक्त आपला देहही देवरूप म्हणजे ब्रह्मरूप झाला असल्याचे अनुभवत असतात. अर्थात, त्यांच्या देहाचे पायही देवरूप असतात. देवरूप झालेल्या त्या पायांवर देवानेही डोई ठेवणे म्हणजे यापूर्वी दोनदा म्हटल्याप्रमाणे स्वत:च्याच सर्वव्यापी व सर्वातीत अशा परब्रह्मस्वरूपाला नमन करणे होय.

३. यापूर्वी २.मध्ये म्हटले आहे की, आपला देहही ब्रह्मरूप झालेला आहे, असे तो अविभक्त भक्त अनुभवत असतो. सद्‌गुरु श्रीवसिष्ठ म्हणतात, की तत्त्वाचे म्हणजे विश्वाच्या व स्वत:च्या अंतिम स्वरूपाचे सानुभव ज्ञान असलेल्या त्या भक्ताच्या म्हणजे खऱ्या तत्त्वज्ञांच्या दृष्टीने ब्रह्म शब्दाचा जो अर्थ तोच देह शब्दाचा अर्थ असतो. जल व पाणी याप्रमाणे देह व ब्रह्म या दोन शब्दांच्या अर्थांमध्ये मुळीच भेद नसतो. स्वप्नाप्रमाणे असलेला देह ब्रह्मच असतो. तो स्वप्नच असतो. पण ही शिष्याला बोध करून देण्यासाठीच योजिलेली युक्ति असते. वस्तुत: ब्रह्म कांही स्वप्न नव्हे. स्वप्न हा शब्द शिष्याच्या परिचयाचा असतो म्हणूनच त्याचा दृष्टान्त देऊन संत सद्‌गुरु हे अज्ञानी शिष्याला त्याच्या ब्रह्मस्वरूपाचा बोध करून देत असतात. अशाप्रकारे सद्‌गुरुंनी समजावून सांगितल्यानंतर व स्वत:चे ब्रह्मस्वरूप अनुभवास आल्यानंतर श्रीरामचंद्र म्हणतात, 'आम्ही पूर्वी आमच्या शरीराला आत्मा समजत होतो. पण आता आम्ही सर्वात्मदर्शी झालो आहे. मी आता सर्वात्मक होऊन संपूर्ण झालो आहे. आपल्या प्रसादानेच जगत् अमृतमय होणेरूपी श्रेष्ठ पदवी प्राप्त झाली आहे. मी स्वत: निर्मलतेस प्राप्त झालो आहे. यास्तव मलाच माझा नमस्कार असो!'[७] देवाधिदेवाचा सातवा अवतार असलेल्या प्रभु श्रीरामचंदांनी स्वत:ला नमस्कार करणे म्हणजेच ब्रह्मस्वरूप अनुभवास आलेल्या भक्ताने आपल्या मानवदेहरूपाला नमन करणे होय. ब्रह्मस्वरूप प्राप्त झालेल्या भक्ताला देवाधिदेवाने नमन करणे म्हणजे त्याने तो भाग्यवान भक्त धन्य झाला असल्याचे वा संपूर्णत्वास पोचला असल्याचे निश्चित करणे होय.

४. संत श्रीनामदेव यांना दररोज भेटणारा देवच त्यांना सद्‌गुरु श्रीविसोबा यांचेकडे आपल्या मूळ स्वरूपाचे सानुभव ज्ञान होण्यासाठी पाठवतो. सद्‌गुरु श्रीविसोबा यांना भेटण्यासाठी ते औंढ्या नागनाथ मंदिरांत जातात. तिथे श्रीविसोबांचे पाय शंकराच्या पिंडीवर असल्याचे त्यांना दिसते. अर्थात, देवाच्या स्वस्वरूपाचे दर्शन घडविण्याचे सामर्थ्य असलेल्या सद्गुरु श्रीविसोबांचे पाय देवाच्या डोक्यावर असल्याचे त्यांना दिसते. देवस्वरूपाचे संपूर्ण ज्ञान नसलेल्या शिष्याच्या दृष्टीने ती विचित्र वा उफराटी बाब असते. त्यावेळी शक्तिहीन वृद्धाचे शरीर धारण करून असलेले श्रीविसोबा आपले पाय जिथे पिंड वा देव नाही तिथे उचलून ठेव, असे श्रीनामदेवांना सांगतात. श्रीनामदेव तसे करू लागतात. पण जिथे जिथे ते विसोबांचे पाय उचलून ठेवतात तिथे तिथे शंकराच्या पिंडीवर विसोबांचे पाय विसावले असल्याचे त्यांना दिसून येत राहते. परिणामीं, पिंडरूपी मूर्त देवाचे मूळ अमूर्त स्वरूप हे विश्वात सर्वत्र वा चराचरव्यापक असल्याचा साक्षात्कार श्रीनामदेवांना होतो. चराचरव्यापक व चराचराहून अनंतपटीने महान असलेल्या देवाचे मानवकृत एक प्रतीक म्हणजे शंकराची पिंड होय. शंकराची पिंड म्हणजे प्रकृति व पुरुष यांचा संगम असलेल्या सजीव भक्ताचे प्रतीक होय. देवाचे प्रतीक असलेल्या या छोट्याशा सजीव भक्ताच्या डोक्यावर त्याच्याच विशाल रूपाचे पाय असल्याचे उमगणे म्हणजे देवाच्या सर्वव्यापक स्वरूपाचे सानुभव ज्ञान होणे

होय. अशाप्रकारे, देवाच्या सर्वव्यापक व सर्वातीत स्वरूपाचे ज्ञान होणे ही महद्भाग्याची गोष्ट असल्याची खात्री सद्गुरु श्रीविसोबा यांनी सत्शिष्य श्रीनामदेव यांना करून दिली होती.

श्रीसद्गुरुकृपेमुळे श्रीनामदेव हे एक महान योगी व संत झाले होते. म्हणूनच 'नामा म्हणे आम्हां तेजाच्या उजेडा। देव केला घोडा बैसावया।।' असे सानुभव आत्मज्ञान नसलेल्या लोकांना उफराटे वाटणारे पण अंतिम देवस्वरूपाबाबत मार्गदर्शक असणारे विधान त्यांनीही करून ठेवले आहे. पिंडातील मूलाधारादि षड्चक्रांचे व ब्रह्मांडातील औटपीठ, गोल्हाट, भ्रमरगुंफादि चक्रांचे तसेच सहस्रदलकमलांत राहणाऱ्या देवस्वरूपाचे त्यांनी केलेले उल्लेख व वर्णन वाचताना विश्वव्यापक देवस्वरूपाचा अनुभव घेऊन त्या स्वरूपाशी एकरूप असल्याचे अनुभवणारा भक्तही देहस्थ देवस्वरूपाहून कसा महान झालेला असतो ते व त्यांच्यासारख्या स्वानुभवी संतयोग्यांनी 'देव केला घोडा बैसावया' असे म्हणणे समर्थनीय असल्याचे स्पष्ट होते. देहस्थ देवाशी एकरूप असल्याचे सानुभव ज्ञान झाले की तोच देव सर्वव्यापक अशा कोटी सूर्यांच्या तेजाहूनही तेजस्वी पण तापहीन असलेल्या देवाधिदेवाकडे भक्ताला घेऊन जातो म्हणजे आपले मूळ स्वरूप कसे आहे ते त्या महाभाग्यवान भक्ताच्या अनुभवास आणून देतो. हे गूढगम्य सत्य 'देव केला घोडा बैसावया' अशा मोठ्या सूचक शब्दात योगिराज संत श्रीनामदेव यांनी व्यक्त करून ठेवले आहे.[८]

५. विशेष म्हणजे, श्रीनामदेव 'देव केला घोडा बैसावया' असे म्हणतात आणि श्रीजनाबाईंप्रमाणे देवाला शिव्या देत श्रीतुकारामांनीदेखील देवाचे अंतिम स्वरूप स्पष्ट करताना देवाची व आपली सरोवरी म्हणजे बरोबरी झाली असल्याचे म्हणत देवाला 'तू गाढव, कुत्रा, भारवाही बैल आहेस' म्हणजे ही सारी रूपे तूच धारण तूच धारण केली आहेस, असे म्हटले आहे.[९]

थोडक्यात, 'तुका तरी सहज बोले वाणी। त्याचे घरीं वेदान्त वाहे पाणी।।' अशी तुकोबांची अभंगवाणी असल्याचे आपल्याला उमगत राहते. विश्वातील सजीव व निर्जीव असलेले अनुक्रमे प्राणी व पदार्थ स्वरूपतः ब्रह्मच म्हणजे देवच आहे, हे स्वानुभवयुक्त विधान म्हणजे वेदान्त होय. तो त्यांनी सदर अभंगातूनही व्यक्त केला आहे. सर्वकाही देवरूपच असल्याने सद्भक्ताचे पाय व देवाची डोई हे समसमान असतात, असा अद्वयस्थितीचा अनुभव असणारा भक्त महाभाग्यवान असतो, असे सन्मुख देवाला उद्देशून लिहिलेल्या 'माझे पाय तुझी डोई' या उफराट्या वाटणाऱ्या भाषेत त्यांनी व्यक्त करून ठेवला आहे.

....................

**संदर्भसूची व टिपा -**


१. दोहा : संपुट माहिं समाइया, सो साहब नहिं होय। सकल मांड में रमि रहा, मेरा साहब सोय।। भावानुवाद : देहसंपुटीं सामावे तो साहेब नोहे खरा। नांदताहे विश्वमंडपीं साहेब माझा खरा।।;

२. चौवीस नामी सहस्रनामी। अनंत नामी तो अनामी। तो कैसा आहे अंतर्यामीं। विवेकें ओळखावा।। आधी देखिला देहधारी। मग पाहावे जगदंतरीं। तयाचेनि या उपरी। परब्रह्म पावावे।। - दासबोध, ११.९.४ व २०;

३. श्रीतुकाराम अभंग : काय तुझा महिमा..;

४. श्रीबहिणाबाई अभंग : षड्गुणऐश्वर्यें थोर तूं जालासी। नावडे आम्हांसी काय तैसे।।१।। जैसा तूं व्यापक सर्वांठायीं हरी। मी काय बिचारी नव्हे तैसी।।५।। जैसा तूं वरिष्ठ त्रैलोक्यनायक। मीही तैसी एक काय नोहे।।६।। परी आम्हां सेव्य नव्हें ते भूषण। सेवकत्वें जाण क्रीडा करूं।।७।।;

५. 'पावलें पावलें ..' या अभंगात पुढे 'जेथें तेथें देखें तुझीच पाउले। त्रिभुवन संचले विठ्ठला गा।।

भेदाभेदमतें भ्रमाचे संवाद। आम्हां नको वाद त्यांशी देऊ।।’, असे श्रीतुकारामांनी देवाला विनविले आहे.

६. उदा. हा संदेश, ‘राया विठोबाचे पद जो अभिळासी। पातकाची राशी तुका म्हणे।।’ आणि ‘विठ्ठलाचे पद जो कोणी अभिलाषी। तो महापातकी म्हणे नामा।।’, असे म्हणत अनुक्रमे श्रीतुकाराम व श्रीनामदेव या दोन्ही संतांनीही देऊन ठेवला आहे.

७. श्रीयोगवासिष्ठ, निर्वाणप्रकरण (उत्तरार्ध), सर्ग क्र. २०२ व २१०, अनुक्रमे पृष्ठ क्र. १७२८ व १७४४; यशवंत प्रकाशन, पुणे - ३०, (१९८१);

८. श्रीनामदेव अभंग : सोळा त्या समाधि ...;

९. श्रीतुकाराम अभंग : बरें आम्हां कळो आले देवपण। आता गुज कोण राखे तुझे ।।१।। आता सरोवरी तुज मज।।२।। जे आम्ही बोलो ते आहे तुझे अंगीं। देईन प्रसंगीं आजि शिव्या।।३।। गाढव कुत्रा ऐसा मज ठावा। बईल तू देवा भारवाही ।।६।।

----

**- डॉ. विजय बाणकर,**

बी-११०९, ग्रासलँड कोऑप. हाऊसिंग सोसायटी,

मु. कोल्हेवाडी, पो. खडकवासला (आर.एस्.).

पुणे - ४११०२४, (९३२५५८८०९५)

***





## ‘ज्ञान’दीप लावू जगी

नामस्मरणरुप भक्तिच्या ज्ञान-दीपाच्या प्रकाशात संत नामदेव व ज्ञानदेवांनी भारतभर विठ्ठलभक्तीचा प्रचार केला. ‘नाचू कीर्तनाचे रंगी। ज्ञानदीप लावू जगी।।’ सर्वत्र ज्ञान-भक्तीचा लोप झाल्यावर अंधश्रद्धेचा अंधार सर्वत्र पसरला. अशा काळात समाजाला भक्ती ज्ञान देण्यासाठी संतांनी आपल्या अभंगवाणीतून मार्गदर्शन केले. अंधार असलेल्या रस्त्यावरून चालताना आपण अडखळून पडू नये म्हणून हातात प्रकाशमान दिवा असेल तर मार्गक्रमणे सुरक्षित होईल.

-नामदेव सदावर्ते

**ज्ञा**नराजांनी ज्ञानेश्वरीत शेकडो दिवे लावून रोषणाई करून दिवाळी साजरी केली आहे. ज्ञानेश्वरीतील ही दीपमालिका सर्वत्र ज्ञान-प्रकाश निर्माण करणारी आहे. महातेजाची आरती व प्रकाशाची पूजा करणारे हे दिवे ज्ञानाचे, तत्वज्ञानाचे आहेत. ज्यांच्या उजेडात आत्मज्ञान स्पष्ट दिसते, असे हे दिवे अज्ञान अंधश्रद्धेचा अंधार दूर करतात. संसारातील दैन्य, दुःख, दूर करून प्रपंचात आनंदरूप प्रकाश निर्माण करतात. ज्ञानेश्वरी या मराठी भाषेतील ग्रंथाला ‘भावार्थ दीपिका’ असे नाव दिले आहे. ज्ञानेश्वरी हा ग्रंथ अलौकिक ज्ञानदीप आहे.

शिष्याच्या हृदयात आत्मज्ञानाचा प्रकाश पाडणाऱ्या सद्‌गुरूंना ज्ञानराज कृपादीपकाची उपमा देतात. ते म्हणतात- गीता मराठी भाषेत सांगण्याचा मला अधिकार नाही, पण तरीही मी गीता मराठी भाषेत सांगण्याचे कार्य केले. गुरुकृपादीपाच्या सोज्वळ प्रकाशामुळेच मला ज्ञानेश्वरीची रचना करता आली.

**येऱ्हवी तरी मी मुर्खु। जरी जाहला अविवेकु।**
**तरी संतकृपादीपकु। सोज्वळु असे।।१.७६**

भगवंत या पृथ्वीतलावर अवतार घेऊन जन-मनावरील अविवेकाची काजळी दूर करतात व विवेकाचा दीप उजळवितात. त्यामुळे भक्ताच्या जीवनात आनंदाची दिवाळी निर्माण होते.

**मी अविवेकाची काजळी। फेडुनि विवेकदीप उजळी।**
**तै योगिया पाहे दिवाळी। निरंतर।।४.५४**

ज्ञानराज दिव्याला विवेकदीप व कृपादीप म्हणतात. तसेच ग्रंथार्थदीपही म्हणतात. भगवद्‌गीतेतील आत्मज्ञान सांगताना ज्ञानराजांनी क्षणभर डोळे मिटले व डोळे उघडताच संत निवृत्तिनाथ म्हणाले, ‘किती चांगले बोललास ज्ञानदेवा! संतवर्णनाच्या ब्रह्मरसाबरोबर तू वाहतोस. आता ग्रंथाच्या अर्थावर प्रकाश पडू दे. संतहृदयमंदिरात त्या ग्रंथार्थाचा प्रकाश पडू दे.’

**परि तो रसातिशयो मुकुळी। मग ग्रंथार्थदीपु उजळी।**
**करी साधुहृदय राऊळी। मंगल उखा।।५.१४२**

आपण ग्रंथाला दीप म्हणतो. ग्रंथाच्या अर्थाचा दीप जेव्हा उजळतो तेव्हाच ग्रंथज्ञान प्रकट होते. अर्जुनाला गीतज्ञान देणारा भगवान श्रीकृष्ण हाच ज्ञानदीप आहे.

सर्व देवांचा देव आत्मा! आत्मा हा प्रत्येकाच्या हृदयात निवास करतो व तो ध्यानाने प्राप्त होतो.

**ऐसे सर्वज्ञानाचा बापु। जो श्रीकृष्ण ज्ञानदीपु।**
**तो म्हणतसे सुकृपु। ऐके राया।।४.२१०**

श्रीकृष्णाचे ते गूढ शब्दांतील ज्ञान बुद्धीला आकलन होत नाही, पण सद्गुरू निवृत्तिनाथांची कृपा माझ्यावर आहे. त्या निवृत्ती कृपादीपाच्या उजेडात मी ते ज्ञान पाहीन व तेच मराठी भाषेत सांगेन. गुरूकृपेने सर्वकाही शक्य आहे.

**ते बुद्धिही आकळितां साकडे। म्हणोनि बोली विपाये सांपडे।**
**परि श्रीनिवृत्तिकृपादीप उजियेडे। देखेन मी।।६.३२**

ज्ञानदेव भगवान श्रीकृष्णाला ज्ञानदीप म्हणतात, तसेच यादव कुळाचा कुळदिवा असेही म्हणतात.

**जो सर्वज्ञतेचा ओलावा। जो यादवकुळींचा कुळदिवां।**
**तो श्रीकृष्ण जी पांडवां । प्रति बोलिला।।८.२७०**

आत्मज्ञानाच्या प्रकाशामुळे संत महात्मे आप पर हा भेद मानत नाहीत. सर्व प्राणीमात्रांवर प्रेम करतात. हे माझ्या मालकाचे घर आहे. तिथे अंधार ठेवावा, असे दिवा कधी म्हणत नाही. सर्वत्र समान प्रकाश देणे हा दिव्याचा स्वभाव आहे.

**कां घरींचिया उजेडु करावा। पारखियां अंधारू पाडावा।**
**हें नेणेचि गा पांडवा। दीपु जैसा।।१२.१९८**

स्थितप्रज्ञ योगी पुरुषांच्या अंतसमयीचे, देहत्यागाचे वर्णन करताना ज्ञानराजांनी दिव्याचा दृष्टांत दिला आहे. योगी ब्रह्मचिंतन करीत असतो. मरण समोर असतानाही त्याचे चित्त स्थिर असते. झाकलेल्या घड्याखाली पणती असते. ती विझते पण कधी केव्हा आणि कशी हे कळत नाही. तसा तो महात्मा शरीर सोडून चैतन्यात मिसळून जातो.

**कां झांकलिये घटीचा दिवा। नेणिजे काय जाहला केव्हां।**
**या रीती जो पांडवा। देह ठेवी।।८.९८**

दीप ज्योतीच्या प्रकाशाचा द्वेष करणाऱ्या पतंग या नावाच्या कीटकाला ज्योतीवर झडप घालण्याची तीव्र इच्छा होते व ज्योतीवर झडप घालताच तो जळून जातो. त्याप्रमाणे संसारी जीव विषयवासनेच्या आसक्तीमुळे नाश पावतो.

**पतंगा दीपी आलिंगन। तेथ त्यासी अचूक मरण।**
**तेवी विषयाचरण। आत्मघाता।।३.२०१**

जे भोगासाठी माझी भजने करतात, ते आशारूपी नेत्ररोगाने दृष्टिमंद होतात. फळाशा प्राप्तीच्या तीव्र इच्छेमुळे त्यांच्या मनात काम उत्पन्न होतो. त्यामुळे त्यांच्या जवळचा ज्ञानाचा दिवा विझतो व ते अज्ञान अंधारात पडून मरतात.

**आणि फळाचिया हावां। हृदयी कामा जाला रिगावां।**
**की तयाचिया घसणी दिवां। ज्ञानाचा गेला।।७.१३९**

सद्गुणांचा निर्मळपणा सर्वत्र असतो. सत्पुरुषांजवळ जसा सद्गुण असतो, तसा दिव्याजवळ प्रकाश असतो. राजबरोबर सतत संपत्ती, समृद्धी असते. या गावातील दिवा कुठेही नेला तरी तो प्रकाश देण्याचे कार्य करीत असतो.

**ना तरी येथींचा दिवा। नेलिया सेजिया गांवा।**
**तो तेथे तरी पांडवा। दीपचि की।।**

सर्व देवांचा देव आत्मा! आत्मा हा प्रत्येकाच्या हृदयात निवास करतो व तो ध्यानाने प्राप्त होतो.

अज्ञानी, अहंकारी व पढतमूर्ख माणसालाही ज्ञानराज दिव्याची उपमा देतात. या दिव्याला वात खाण्याची व तेल पिण्याची सवय असते. थोडासा उजेड पसरवितो पण काजळीने घर काळे करतो. याच्या ज्योतीवर थोडेसे पाणी पडताच तडतडतो. प्रकाश थोडासा पण उष्णता जास्त. ज्ञान थोडेसे पण गर्वच जास्त.

**अळुमाळु प्रकाशु करी। तेतुले नीच उबारा धरी।**
**तैसिया दीपाचिया परी। सुविधु जो।।१३.७२१**

नामस्मरणरुप भक्तिच्या ज्ञान-दीपाच्या प्रकाशात संत नामदेव व ज्ञानदेवांनी भारतभर विठ्ठलभक्तीचा प्रचार केला. 'नाचू कीर्तनाचे रंगी। ज्ञानदीप लावू जगी।।' सर्वत्र ज्ञान-भक्तीचा लोप झाल्यावर अंधश्रद्धेचा अंधार सर्वत्र पसरला. अशा काळात समाजाला भक्ती ज्ञान देण्यासाठी संतांनी आपल्या अभंगवाणीतून मार्गदर्शन केले. अंधार असलेल्या रस्त्यावरून चालताना आपण अडखळून पडू नये म्हणून हातात प्रकाशमान दिवा असेल तर मार्गक्रमणे सुरक्षित होईल.

**जैसे मार्गेचि चालता। अपावो न पवे सर्वथा।**
**कां दीपाधारे वर्तता। नाडळिजे।।२.१८७**

पथ्य न पाळणारा जसा शरीरात ताप वाढवतो, दीपाचा कंटाळा करणारा जसा अंधार दूर करू शकत नाही, तसेच सद्विवेकाच्या द्वेषाने माणूस गर्व-अहंकार वाढवतो. म्हणून अंधार नको असेल तर हातात दिवा घ्यावा. ताप-आजारपण नको असेल तर पथ्ये पाळावीत. अज्ञान, अंधश्रद्धा नको असेल तर ज्ञानाचा दिवा हाती घेऊन चालावे.

**पथ्यद्वेषिया पोषी ज्वरू। कां दीपद्वेषिया अंधकारू।**
**विवेकद्वेषे अहंकारू। पोषोनि जैसा।।१८.१२७८**

शरण आलेल्या अर्जुनाला भगवंतांनी आलिंगन दिले. आपल्या हृदयातील आत्मज्ञान अर्जुनाच्या हृदयात घातले. त्यामुळे दोघे एकरूप झाले. एका दिव्याने दुसरा दिवा लावला. ते दिवे दोन दिसत असले तरी प्रकाशाच्या दृष्टीने एकच आहेत.

**दीपे दीप लाविला। तैसा परिष्वंग तो जाला।**
**द्वैत न मोडितां केला। आपणपें पार्थु।।१८.१४२१**

गीतेत भगवंत अर्जुनाला म्हणतात, जे भक्त आपल्या अहंकारासह सर्वस्वाचा त्याग करतात आणि माझ्या स्वरुप मंदिरात येतात, त्यांच्या जीवनमार्गात मी सतत ज्ञानरूप कापराची मशाल ज्योत घेऊन मशालजी बनून पुढे चालतो. त्याच्या मार्गात जेव्हा अंधारी ज्ञानरात्र येते, तेव्हा गडद काळोख दाटतो. तो काळोख दूर करून त्यांच्यासाठी दिव्य प्रकाश करतो.

**तया तत्वज्ञा चोखटां। दिवी पोतासाची सुभटा।**
**मीचि होऊनि दिवटां। पुढां पुढां चाले।।१०.१४२**

श्रीकृष्णार्जुनाचा ज्ञानसंवाद पूर्ण झाल्यावर दोघे देव भक्त एकरू झाल्याचे सांगताना ज्ञानराज म्हणतात-

**कां दीपासन्मुखु। ठेविलया दीपकु।**
**कोण कोणा आर्थिकु। कोण जाणे।।१८.१५९७**

एका दिव्यासमोर दुसरा दिवा ठेवल्यावर दिवे दोन दिसत असले तरी प्रकाश एकच असतो. प्रकाशात द्वैत नसते. गुरू-शिष्य, देव भक्त हे एकरूपच असतात. गीतेत सातशे श्लोक आहेत. हे सातशे श्लोक ज्ञानप्रकाश पसरविणारे ज्ञानदीपक आहेत. सर्व प्रकाशमय दिव्यात प्रथम लावलेला कोणता व नंतर लावलेला कोणता असा भेद नसतो.



**दीपा आगिलु मागिलु। सूर्य धाकुटा वडिलु।**
**अमृतसिंधु खोलु। उथळु कायसा।।१८.१६७८**

मनात अखंड प्रसन्नता असेल तर दैवयोगाने प्राप्त झालेल्या दुःखाचा आघात सहन करण्याचे सामर्थ्य प्राप्त होते. स्थिरबुद्धीचे वर्णन करताना संत सांगतात, वाहता वारा नसलेल्या ठिकाणी शांतपणे तेवणारी दीपज्योत ज्याप्रमाणे कंप पावत नाही-

**जैसा निर्वातीचा दीपु। सर्वथा नेणे कंपु।**
**तैसा स्थिरबुद्धी स्वस्वरुपी। योगयुक्त।।२.३४१**

जो भक्त ईश्वर नामस्मरणात मग्न असतो, आपला बहुमूल्य ठेवा आपल्या घरीच असतो. पण मोह, अज्ञानाच्या अंधारामुळे आपलाच ठेवा आपल्याला दिसत नाही. जर हातात दिवा असेल तर आपल्या घरचा ठेवा दिव्याच्या प्रकाशामुळे डोळ्याला दिसेल.

**मग घरींचाचि ठेवा। जेवी डोळ्यां दावी दिवा।**
**तरी घेता काय पांडवा। आडळू असे।।१८.८९२**

पंचमहाभूतांपासून जसे विश्‍व बनले आहे. त्याप्रमाणेच पणती, तेल, वात व अग्नी एके ठिकाणी येताच दिवा प्रकट होतो. प्रकाशमान ज्योत निर्माण होते.

**कां स्नेह सूत्र वन्ही। मेळु एके स्थानी।**
**धरिजे तो जनी। दीप होय।।१३.१५४**

संस्कृत भाषेतील गीतेवरील ज्ञानेश्‍वरी हा ग्रंथ मराठी भाषेत लिहिणाऱ्या ज्ञानराजांचे वर्णन करताना संत नामदेव म्हणतात ज्ञानराजांनी लिहिलेली मराठी भाषेतील ही भावार्थदीपिका अध्यात्मविद्येचे रूप प्रकट करणारी आहे.

**अध्यात्म विद्येचे दाविलेसे रूप। चैतन्याचा दीप उजळीला।।**

धर्मोपासना मार्गातील अज्ञान, अंधश्रद्धा, निरर्थक कर्मकांडाचा अंधार दूर करण्यासाठी ज्ञानेश्‍वरीत दिव्यांची रोषणाई करणाऱ्या संत ज्ञानदेवांना भक्तिपूर्वक वंदन!

**-नामदेव सदावर्ते,**
नाशिक

***



सर्व देवांचा देव आत्मा! आत्मा हा प्रत्येकाच्या हृदयात निवास करतो व तो ध्यानाने प्राप्त होतो.



## दसरा दिवाळी तोचि आम्हां सण

देहात देह होऊन राहून सुखाचा अनुभव घेत राहणे हा नरक, तर देहात देहातीत राहून देह परे आनंद अनुभव घेत राहणे हा स्वर्ग आहे. म्हणजेच स्वर्ग आणि नरक हे इथेच आहेत. आपल्यातील अज्ञानरूपी रावणाचा व संसाराभिमुख देहाभिमानी नरकासुराचा अंत झाल्यावर तेथे ज्ञानसूर्याचा उदय व सर्वत्र नित्य व्याप्त अनुभूतीने सच्चिदानंद अनुभूतीच येणार. संत संगतीने अंतःकरणात ज्ञानदीप उजळणार असल्याने संत भेटीचा दिवस वा क्षण हा दीपावळीपेक्षा कमी नाही, म्हणून संत भेटीला दिवाळीची उपमा दिली आहे.

-बंडोपंत कुलकर्णी

दसरा दिवाळी तोचि आम्हां सण।
सखे संतजन भेटतील।।
आमुप जोडल्या पुण्याचिया राशी।
पार त्या सुखासी नाही लेखा।।
धन्य दिवस आजी झाला सोनियाचा।
पिकली हे वाचा रामनामें।।
तुका म्हणे काय होऊं उतराई।
जीव ठेवू पांयीं संतांचिये।।

या अभंगात संतजनाची भेट घडल्या क्षणाला दसरा आणि दिवाळी म्हटले आहे. यावरून दसरा आणि दिवाळी सणांची महती जाणून घेणे आवश्यक आहे. राम हे विष्णूचे सातवे अवतार. सामान्य जीवाचे रूप घेऊन वावरताना देवाचा अवतार म्हणून भोग भोगण्यात विशिष्ट सवलत नाही. देह धारण केल्यावर देहाचे परिणाम भोगणे क्रमप्राप्त आहे. देह नको म्हणून मोक्ष प्राप्तीची इच्छा व त्यासाठी साधना केली जाते. राम-सीता वनवासात असताना रावणाने सीतेचे अपहरण केले व श्रीरामांनी रावणाशी युद्ध करून विजयादशमीच्या दिवशी रावण वध करून युद्धात विजय प्राप्त केला, अशी पौराणिक कथा आहे. विजयाची आठवण, सत्याचा असत्यावर विजय, न्यायाचा तसेच नीतीचा अनितीवर विजय दिवस म्हणून या दिवशी भारतात अनेक ठिकाणी रावणाचा पुतळा जाळला जातो

पांडव कौरवांसोबतचे द्युत हरले व सर्व गमावले. त्यांना वनवास व अज्ञातवासात जावे लागले. आश्विन शुद्ध दशमीच्या दिवशीच्या दिवशी पांडव अज्ञातवास संपवून परत आले, असे पौराणिक ग्रंथ महाभारत सांगते. पांडवांनी अज्ञातवासात जाण्यापूर्वी आपली शस्त्रे शमीच्या झाडात लपवून ठेवली होती. त्यामुळे विजयादशमीला शमीची पूजा करून त्याला औक्षण केले जाते.

रावणाशी युद्धात विजय प्राप्त करून चौदा वर्षांचा वनवास संपवून रामचंद्र सीतेसह अयोध्येला परत आले तेव्हा अयोध्येतील प्रजेने दीप लावून श्रीरामांचे स्वागत केले, म्हणून तो दिवस दिपावळी म्हणून साजरा होतो. शिवाय दीपावळी अंधार दूर करून प्रकाश निर्माण करणारा असल्याने दीप मांगल्यरूप असल्याची धारणा आहे. त्याच्या प्रकाशाने आपल्या जीवनातील अंधकार दूर व्हावा, म्हणून हा दीपोत्सव

साजरा केला जातो.

श्रीकृष्णाने अत्याचारी नरकासुराचा वध केला, ज्याला नरक चतुर्दशी म्हणतात व तो दिवाळीच्या पहिल्या दिवशी साजरा केला जातो. नरकासुराचा वध झाल्याने अमावस्येच्या दुसऱ्या दिवशी गोकुळवासीयांनी दीपप्रज्वलन करून आनंद साजरा केला. दसरा व दिवाळी या दोन्ही उत्सवांशी रामायण व महाभारताचा संबंध आहे. तेव्हापासून दसरा व दीपावळी उत्सव साजरे होतात, हे दिसून येते. आता आपण भक्त भाविकांना अपेक्षित दसरा व दिवाळी उत्सव पाहू.

ज्या दिवशी वा क्षणी संतांची भेट घडेल तो दिवस वा क्षण भक्त भाविकांना दसरा दिवाळी उत्सवासम नव्हे तर दसरा दिवाळी उत्सवच असतो. तिथे मास, तिथी, नक्षत्र वा शके याचा काहीही संबंध नाही. त्यामुळे संत, ऋषी वा साधू यांचा महिमा अपरंपार, कालातित आहे. त्यामुळे ऋषी, साधू, संत व महात्मे वगैरे यांचे महिमान जाणणे अगत्याचे आहे. ऋषी हे बीजात्मक भाव आहे. जी व्यक्ती आत्मसाक्षात्कार व अनुभूतीने सर्व काही एकात व आपल्यात पाहाते, ती ऋषी होय. माझ्या मते संत आणि साधू यांच्यामध्ये फारसा फरक नाही. व्यक्तीचा म्हणजे संसारी देहाभिमानी व्यक्तीचा आत्मज्ञानाने अंत होऊन देव समकक्ष होऊन उरतो, तो संत होय. साधनेने आत्मदर्शन साध्य होऊन त्याच्यातील व्यक्ती विशेषतः व अहंकार गळून पडल्यावर उरतो तो साधू होय. ऋषी, संत व साधू हे ब्रह्मज्ञानी होऊन त्यांचे सर्व रिपूंचे दमन झालेले असते. संतांच्या ठिकाणी करूणा असते व ते पुण्यवानासह पापी लोक यांना समान उपदेश करून धर्मपथावर आणण्याचा प्रयत्न करतात. सत्याची उपेक्षा करणाऱ्यांचा प्रतिकार करून त्यांना वठणीवर आणण्याचे काम साधूसंत करतात व ते त्यावेळी आपली साधना ढळू देत नाहीत. त्यांचे रिपू हे फक्त आणि फक्त धर्म रक्षणासाठी जागे होतात.

हा अभंग समजून घ्यावयाचा असेल तर प्रथमतः त्या अभंगातील दुसऱ्या व तिसऱ्या चरणांचे चिंतन करणे आवश्यक आहे. दुसऱ्या व तिसऱ्या चरणात संत सज्जन भेटीचे परिणाम वर्णन केले आहे.

**आमुप जोडल्या पुण्याचिया राशी।**
**पार त्या सुखासी नाहि लेखा।।**

आयुष्यात घडलेला बदल काय तर अनेकानेक पुण्य प्राप्त झाले. त्या पुण्याची गणना कोण करी? पुण्य म्हणजे काय?

**पुण्यपर उपकार पाप ते पर पीडा।**
**आणिक नाही जोडा दुजा यासी।।**

यात संतानी पाप-पुण्य केव्हा घडते हे सांगितले आहे. उपकार हे पुण्य कर्म आहे. कार म्हणजे निःस्वार्थ व सद्हेतूने केलेले कर्म. आपणाला कारसेवा हा शब्द परिचित आहे. स्वार्थ आणि निश्चित सुख व लाभासाठी लोभ ठेवून केलेले कार्य हे काम होय. ब्रह्मांड निर्माण हे परमेश्वराचे कार आहे. कारण त्यानेच हे साकार केले आहे. म्हणून परमेश्वराच्या कार्याला कार व सामान्यांचे फक्त कर्म असे म्हंटल्यास वावगे ठरणार नाही. मनुष्य जेव्हा परमेश्वराइतके नव्हे तर परमेश्वराप्रमाणे निःस्वार्थ व सद्हेतूने कार्य करेल, तेव्हा ते उपकार ठरते. उप म्हणजे अंशात्मक होय. येथे नैतिक कर्माचा विचार होत असल्याने नैतिक कर्माचे अंशात्मक कर्म हे उपकर्म वा उपकार होय. ईश्वर वा साधुसंत यांच्याकडूनच निर्भेळ-नैतिक कर्म घडत असल्याने त्याला ईश्वरी कर्म वा नियत कर्म म्हणतात. परमेश्वराप्रमाणे सर्व कार्य मनुष्य करू शकत नाही.

तो त्यातील काही प्रमाणात करू शकतो. त्याप्रमाणे काही प्रमाण हे उप आणि केलेले कार्य कार असे हे उपकार. परमेश्वर हा जसा जीवांचा सांभाळ करतो व काळजी घेतो, तसे हे कार्य करण्यासाठी तत्पर असावे, यासाठी स्वतःचा सांभाळ व काळजी स्वतः घेतो. पण स्वतःची काळजी हे कार या शब्दात बसत नाहीतर त्यासाठी दुसऱ्यांची काळजी आणि सांभाळ आवश्यक आहे व तेव्हाच परोपकार ठरते, ते पुण्यमय असते. संत भेटीने पुण्य प्राप्तीसह अमूल्य आणि अमाप सुख प्राप्त झाले, असे संत सांगतात. हा पहिला परिणाम होय.

सर्वसामान्य संसारीक भक्त भाविकाला ईश्वर नामसंकिर्तन वा नामस्मरण हीच भक्तीयोग साधना असते. तो ईश्वराचे नाम जपमाळ घेऊन घोकत असतो. नुसते नामस्मरण पुरेसे नाही. नामस्मरण इतके व्हावे की त्यातून रामबिंब उलगडणे आवश्यक आहे. कैरी पिकायला घातल्यावर तो काही दिवसांनी आंबा होतो. तसे नामसंकिर्तन हे कैरी रूप आहे. नामस्मरण वा नामसंकिर्तन करताना मनाच्या अवस्थेवर व आर्ततेवर त्याचे फलित अवलंबून आहे. ईश्वर अनुभूतीसाठी आवश्यक आर्तता नामस्मरणात असेल, तर त्या नामातून अनाम ईश्वरबिंब अंतःकरणात अनुभूतीस येऊन ईश्वरी साक्षात्कार होतो. तो साक्षात्कार तुकोबाराय यांना झाला. म्हणून ते म्हणतात,

**धन्य दिवस आजी झाला सोनियाचा।**
**पिकली हे वाचा रामनामें ।।**

हा दुसरा परिणाम होय.

संत दर्शनाने अमाप पुण्य प्राप्त झाले, हा पहिला परिणाम, तर ईश्वर साक्षात्कार झाला, हा दुसरा परिणाम होय. या परिणामांना संतमन हे

**दसरा दिवाळी तोचि आम्हां सण।**
**सखे संतजन भेटतील ।।**

असे का म्हणते? आपण यापूर्वी चिंतन केल्याप्रमाणे राम हा भगवान विष्णूचा सातवा अवतार. रामाने आपले जीवनमान नैतिक मूल्य सांभाळून आदर्श पद्धती अवलंबून संसार व राज्य सांभाळले. त्यामुळे ते पुढे मर्यादा पुरूषोत्तम राम झाले. वर चिंतन केल्याप्रमाणे संत हे संपूर्ण सृष्टीला आपल्यात बीजरूपाने पाहत असल्याने इतरांचा घात त्यांच्याकडून घडत नाही. त्यांच्या ठायी कोणाप्रती भेदभाव नसतो. ते जे करतील ते फक्त ईश्वरी कार्य असते. म्हणून त्यांच्या संगतीत तसेच गुण प्राप्त होणार असल्याने व त्यांच्या सोबतीने फक्त ईश्वरी कार्य आपल्या हातून घडणार असल्याने अमाप पुण्य प्राप्त होईल. शिवाय त्यांच्या संगतीने आपल्या आत वसलेल्या अज्ञानरूपी रावणाचा अंत होऊन ज्ञान मार्गावर रूढ सत्संग घडणार, म्हणून संत भेटीच्या दिवसाला वा क्षणाला दसरा उत्सवाची उपमा दिली आहे.

देहात देह होऊन राहून सुखाचा अनुभव घेत राहणे हा नरक, तर देहात देहातीत राहून देह परे आनंद अनुभव घेत राहणे हा स्वर्ग आहे. म्हणजेच स्वर्ग आणि नरक हे इथेच आहेत. आपल्यातील अज्ञानरूपी रावणाचा व संसाराभिमुख देहाभिमानी नरकासुराचा अंत झाल्यावर तेथे ज्ञानसूर्याचा उदय व सर्वत्र नित्य व्याप्त अनुभूतीने सच्चिदानंद अनुभूतीच येणार. संत संगतीने अंतःकरणात ज्ञानदीप उजळणार असल्याने संत भेटीचा दिवस वा क्षण हा दीपावळीपेक्षा कमी नाही, म्हणून संत भेटीला दिवाळीची उपमा दिली आहे. संतांच्या भेटीने या देहाचे व जीवनाचे कल्याण होणार असल्याने संतश्रेष्ठ जगद्गुरू तुकोबाराय संतांचे

ऋण व्यक्त करताना म्हणतात,

**तुका म्हणे काय होऊं उतराई ।**

**जीव ठेवू पांयीं संतांचिये ।।**

आपल्यासारख्या सामान्य जीवांना सोमवारी महादेव, मंगळवारी देवी, बुधवारी विठ्ठल, गुरूवारी दत्तात्रय, शुक्रवारी अंबाबाई, शनिवारी हनुमान व रविवारी सूर्यनारायण हे देव म्हणून आठवतात. जणू इतर दिवशी ते देव नसतातच. सण वार, उत्सव याबाबतीत सामान्य जीवाची प्रवृत्ती त्याप्रमाणेच आहे. संत महात्म्यांना सर्व दिवस सारखेच असतात. सर्व दिवस, सर्व वार, काळ व दिशा हे ईश्वर निर्मित असल्याने ते वाईट नाहीत. चांगले व वाईट हे आपल्या प्रवृत्तीत आहे. अनिच्छा व अभेद दृष्टी ठेवून जगताना कोणत्याच गोष्टीचा वा दिवस, वार, काळ व दिशा यांचा परिणाम आपल्यावर होत नसल्याने फक्त ज्ञानसूर्याच्या तेजात अंतरंगी ज्ञानदीप तेवत राहून अनुभूतीला मार्गदर्शन होत जाते. हे सुख व आनंद दसरा दिवाळी उत्सवापेक्षा कमी नाही. हे संतभेटीने घडत असल्याने भेटीचे क्षण वा दिवस हा संतांसाठी दसरा दिवाळी उत्सव असतो.

**कृष्णार्पणमस्तू। आत्मा मालिक।**

**-बंडोपंत कुलकर्णी, सोलापूर**
जिल्हा न्यायाधीश, पुणे





## जगद्गुरू तुकोबांची दिवाळी

**ही दीपावली आत्म्याची, ही दीपावली आत्मोन्नतीची. हा दीपोत्सव तर आत्मोद्धाराचा. हा दीपोत्सवी अवघा माहोल तर आत्मदेवाच्या ठायी लीन असणारा.. यांची दिवाळी हरिचे भाविक अन् नामसाधक भेटण्यासाठी अतीव आनंदाचा. आपले देहूचे जगद्गुरु संत तुकोबारायांची दीपावली तर काय वर्णावी, काय कथावी, काय निरुपणावी? या दिवाळीलाही नाही तुलना, नाही प्रतिमा, नाही मर्यादा वा नाही बंधन लौकिकाचे!**

**-डॉ. सुनील शिंदे**

**सं**तसज्जन-साधू संन्यस्त, योगी-ऋषी मुनींच्या दिवाळीचे महात्म्यच विलक्षण महाराज. यांची दिवाळी काही प्रपंचात सीमित सर्वार्थाने केवळ आणि केवळ व्यावहारिक जगाची नसावी अन् नक्कीच नव्हती देवा!

ही दीपावली आत्म्याची, ही दीपावली आत्मोन्नतीची. हा दीपोत्सव तर आत्मोद्धाराचा. हा दीपोत्सवी अवघा माहोल तर आत्मदेवाच्या ठायी लीन असणारा.. यांची दिवाळी हरिचे भाविक अन् नामसाधक भेटण्यासाठी अतीव आनंदाचा. आपले देहूचे जगद्गुरु संत तुकोबारायांची दीपावली तर काय वर्णावी, काय कथावी, काय निरुपणावी? या दिवाळीलाही नाही तुलना, नाही प्रतिमा, नाही मर्यादा वा नाही बंधन लौकिकाचे! रामनामाने, आत्मारामाने, रामोच्चाराने, रामवाचेने अलंकृत... विठोच्या आठवाने, विठोचिया नामाने, विठोच्या ध्यासाने अन् विठ्ठलनामी श्वासोच्छवासे ही विलक्षण अनुभूती अवघा देहच काय आत्मनिवास लखलख लखलख उजळोन टाकणारा... दीपोत्सवी घेवोन जाणारा...

साक्षात काळाने तटस्थ होऊन हार पत्करावी, दु:ख-दैन्य हरपावे, हटावे एवढी मनोनिग्रही ताकद या विलक्षण दिवाळीच्या आनंदात प्राप्त व्हावी, असा महिमा तुकोबाराय वर्णितात.

**दिवाळी दसरा नाहीं आम्हा सण।**
**सखे हरिजन भेटतांचि।।१।।**
**धन्य तो दिवस जाला सोनियाचा।**
**विकली हे वाचा रामनामें।।२।।**
**दु:ख तें दरिद्र गेलें हरपोनी।**
**तटस्थ होऊनि काळ ठेला।।३।।**
**तुका म्हणे काय होऊं उतराई।**
**जीव ठेवूं पायीं संताचिया।।४।।**

संताचिया पायी जीव अर्पावा, या चरणांवरी सर्वस्व अर्पावे, उतरायी तरी कसे व्हावे या दीपोत्सवी आनंदाने महाराज! तेथीचा सुखसोहळा अलौकीक अलौकीक!!

वैष्णवजनांची-सज्जनांची भेट हीच खरी सणाची पर्वणी, असे संत तुकाराम महाराज समजतात. हरिनाम, श्रीरामाचे नाम मुखी असावे तोच तर खरा सोन्याचा दिवस. वाचेने रामनाम घ्यावे, नित्य वदावे. त्यात जो आनंद तो अनमोल अन् अवर्णनीय खरा. नाम साधनेचे मोल अपार. नाम महात्म्य तोलामोलाचे. ज्यामुळे दु:ख निवारण व्हावे, दैन्य हरपून जावे, साक्षात काळ देखील तटस्थ होऊन स्थिर व्हावा एवढे सामर्थ्य नामात आहे, श्रीराम नामात आहे. संतांच्या पायी जीव वाहावा, अर्थात सेवा घडावी यापेक्षा उतराई होणे ते कसे असू शकते? हाच खरा सण. हाच खरा आनंदोत्सव. दसरा सण तोच. दीपोत्सवही तोच!

**सर्व देवांचा देव आत्मा! आत्मा हा प्रत्येकाच्या हृदयात निवास करतो व तो ध्यानाने प्राप्त होतो.**

नामसाधनेला सामर्थ्य आहे, सर्वस्व आहे, बळ आहे. नामाची थोरवी आहे. त्यात असणारे सौख्यशांती-मनाची स्थिरता याला तुलना नाही. तोड नाही, दिवाळी सण यापेक्षा वेगळा कोणता? या अर्थाने नित्य दिवाळी तीच नामसाधनेची. स्वास्थ्य, स्थैर्य, दिलासा, आनंद, समाधान, सुख, चित्ताची एकतानता, भगवंताच्या निकट असणे हे सारे सारे साध्य होईल आणि होते ते केवळ मुखी मनापासून नित्यनेमाने नाम घेण्यानेच, हा आहे संत तुकोबांचा विश्वास.

**रवि दीप हीरा दाविती देखणे।**
**अदृश्य दर्शने संतांचिया।।१।।**
**त्यांचा महिमा काय वर्णु मी पामर।**
**न कळे तो साचार ब्रह्मादिकां।।ध्रु.।।**
**तापली चंदन निववितो कुडी।**
**त्रिगुण तो काढी संतसंग।।**
**संतांचें वचन वारी जन्मदुःख।**
**मिष्टान्न तें भूकनिवारण।।**
**तुका म्हणे जवळी न पाचारितां जावें।**
**संतचरणीं भावें रिघावया।।**

रविदीपही तोच अंतरीचा भाव. त्याचे दर्शनही घडविता असणारे संतच तर श्रेष्ठ सहवासाचे! साक्षात ब्रह्मादिकांनाही न कळणारा महिमा आपण पामराने काय वर्णावा ही तुकोबांची विलक्षण विनम्र भावना. विकारांनी तप्त देह निववावा तो ही चंदनाच्या सामर्थ्याने आणि सत्व-रज-तमादि त्रिगुण तेही विमुक्त करावे ते संतांनी अन् नामसार्थ्याने ही जगद्‌गुरु संत तुकोबारायांची भावना. जन्मदुःखाचे निवारण संत वचन करते. भूकनिवारण व्हावे अन् मिष्टान्न लाभावे तसा अनुभव संत सहवासात तसेच नाम सामर्थ्यात. न बोलावता अर्थात निमंत्रणाविणा जावे, असे एकमेव ठिकाण म्हणजे संतांच्या चरणांचे ते ठिकाण!

संत सहवास अन् नाम महात्म्य या दोन्ही बाजू सबख तेथेच भगवंत आहे. तोच आनंदाचा ठेवा आणि तोच दिवाळी दसरा!

तुकोबांना छळणारे कमी नव्हते. तुकोबांना घेरणारे कमी नव्हते. तुकोबांना भंडावून सोडणारे कमी नव्हते. वितंडवाद घालणारे, खोडसाळ कारवाया करणारे, सातत्याने टोचून खोचून बोलणारे, मारेकरी सोडणारे, मारपीट करणारे असे हाडवैर धरणारे विपुल होते.. तरीही तरीही अपार वेदनांचे मोहोळ सोसूनही -

**तुका म्हणे काय होऊं उतराई। जीव ठेवूं पायीं संताचिया।**

असा निर्वाळा तुकोबा देतात. आपली उदार भूमिका व्यक्त करतात आणि 'तटस्थ होऊनि काळ ठेला' अशी जगावेगळी लोकविलक्षण दिवाळी अभिव्यक्त करताना दिसतात..' धन्य तो दिवस जाला सोनियाचा, विकली हे वाचा रामनामें!' अशीही शाश्वती धीरोदात्तपणे देतात.

हा असा दीपोत्सव तुकोबांचा, हे दीपदान त्यांचे. ही झळाळी, ही दीप्ती, ही प्रकाशपर्वाची अनुभूती थक्क करणारी अन् अंतर्मुख करणारीही.

**-डॉ. सुनील शिंदे**
'दत्त सुकृत ', व्हेलेन्सिया रेसिडेन्सी,
बी-विंग, फ्लॅट नं. १०४, पहिला मजला,
अगस्ती सहकारी साखर कारखाना रोड,
अकोले, जि. अहमदनगर
(मो. ९४२३०४५३४२/ ९०७५९९४३३२)

***



## दीपावली सण आनंदाचा

दिवाळी सणास अध्यात्मिक दृष्टीने तितकेच महत्त्व आहे. हा सण मांगल्याचे प्रतीक आहे. मनुष्याला जीवनांत आनंद पाहिजे असतो. सुख, समृद्धी व ऐहिक आनंद प्रापंचिकदृष्ट्या जसा महत्त्वाचा आहे, तसाच आपले जे नीज स्वरूप आत्मा आहे, तो मूळचाच आंनदमय आहे. आत्मिक म्हणजेच शाश्वत आनंद मिळणे, आवश्यक असते. त्यासाठी ही संत संगती सहवास यांचे जीवनांत अत्यंत महत्त्व आहे. संत सहवासात जीवाला ईश्वर भक्तीची ओढ लागते. ममुक्षूला सद्‌गुरूंची भेट होते.

- बी. के. गायकवाड

श्रावणातील गोकुळ अष्टमी, नारळी पौर्णिमा, रक्षाबंधन, भाद्रपद मासातील श्री गणेश उत्सव, अनंत चर्तुदशी, त्यापुढे पितृ श्राद्ध पंधरवडा समाप्तीनंतर येणाऱ्या आश्विन शुद्ध प्रतिपदेपासून सुरू होणारा आदिशक्ती देवीचा शारदीय नवरात्र उत्सव आणि आश्विन शुद्ध दशमीस दसरा सण. साडेतीन मुहूर्तांपैकी एक प्रमुख मुहूर्त. सर्वत्र अत्यंत उत्साहात आनंदात साजरा करण्यात येतो. दसऱ्याला सीमोल्लंघन करून आपटा वृक्षाची पाने सुवर्णपान म्हणून एकमेकास भेटून वाटण्यात येतात. याच दिवशी प्रभुरामचंद्रांनी रावणाचा युद्धात पाडाव केला. दुष्टांचा संहार करून सज्ञनांचे रक्षण केले, ही विजयादशमी. याच्या आदल्या दिवशी खंडेनवमीस आयुधांची (शस्त्रे, यंत्रे) पूजा करण्यात येते. याच दिवशी पांडवांनी वनवास पूर्ततेनंतर शमी वृक्षाच्या ढोलीत ठेवलेली शस्त्रे बाहेर काढली व त्यांचे पूजन केले.

आश्विन पौर्णिमेला शीतल शुभ्र चंद्र प्रकाशातील कोजागरी पौर्णिमा, चंद्र दर्शनात दुग्धप्राशन केले जाते. वर्षातील महत्त्वाचा आनंदाचा सण दीपावली आश्विन वद्य द्वादशी वसुबारस, गायी-वासराच्या पूजेने प्रारंभ होतो. भारत हा शेतीप्रधान देश असल्याने वसुबारशीला गोमातेच्या पूजेस विशेष महत्त्व असते.

दीपावली या मांगल्याच्या सणाच्या आगमणाने सर्वत्र चैतन्यमय, उत्साहाचे वातावरण असते. घराची सजावट, नवीन वस्त्रालंकार, गृहोपयोगी उपकरणांची खरेदी होते. घराच्य अंगणात सडासंमार्जन करून त्यावर सुंदर रांगोळ्या व त्यातील उठून दिसणारे शुभ 'स्वस्तिक' आकाशदीप, विद्युत रोषणाई, दिव्यांची आरास करण्यात येते.

या सर्वांनी मनाला प्रसन्नता येते. दीपावली सणात प्रथम पर्जन्य ऋतूत पर्जन्यवृष्टीने धरणीमाता तृप्त झालेली असते. ऐन दिवाळीत काही ठिकाणी स्वाती नक्षत्राचा पाऊस होतो. शेतातील बहुतांशी खरीप पिके काढणीसाठी तयार होऊ लागतात. शरद ऋतू, हिवाळ्याच्या आगमनाची चाहुल लागते.

आश्विन वद्य त्रयोदशी म्हणजे धनत्रयोदशी आणि धन्वंतरी पूजन. या दिवशी धनाच्या पूजेसह आरोग्य देवता विष्णूस्वरूप धन्वंतरींची पूजा करून निरामय आरोग्यासाठी आशीर्वाद घेण्यात येतात. संत जगद्‌गुरू तुकाराम महाराज म्हणतात, 'धन श्रमाद्वारे चांगल्या मार्गाने मिळवावे व ते उत्तम प्रकारे

खर्च करावे. याच दिवशी कुबेरपूजन करतात. दक्षिणेस दीप लावून यमपूजन करतात. वद्य चतुर्दशीला राक्षस नरकासुराचा वध केला. पहाटे पवित्र मांगल्याच्या ब्रह्ममुहूर्तावर लवकर उठून अंगास उटणे, प्रासादिक सुगंधीत द्रव लावून अभ्यंगस्नान करण्यात येते. स्नानानंतर प्रसन्न मनाने, भक्तिभावाने परमात्म्याची ध्यान-धारणा, चिंतन-स्मरण केले जाते.

आश्विन वद्य ३० अमावास्या दीपपूजन, दिवाळी सणाचा, श्रीलक्ष्मीपूजेचा मांगल्याचा दिवस. या दिवशी सर्वत्र दीपोत्सव करण्यात येतो. श्रीविष्णु पत्नी 'श्रीलक्ष्मी' देवतेची पूजा अत्यंत प्रसन्न मनाने, आनंदात केली जाते. अबालवृद्ध यात सहभागी होतात. आगामी हिवाळा ऋतूतील थंडीपासून रक्षणासाठी घरात गृहिणीने दिवाळीचा फराळ, गोड-गोड स्निग्ध पदार्थ बनविलेले असतात. जे शरीराला आवश्यक उष्णता देतात. आश्विन अमावास्येच्या श्रीलक्ष्मी पूजनानंतर कार्तिक मासारंभ होतो. प्रतिपदेला दीवाळी पाडवा जो साडेतीन मुहूर्तातील अर्धा मुहूर्त होय. यास बलिप्रतिपदा म्हणतात. भगवान विष्णूंनी आपल्या दशावतारातील 'वामन' अवतारात बली या बलवान दानशूर राक्षसराजास देवास वरचढ होऊ नये म्हणून बटू अवतार घेवून त्याच्याकडून भूमिदान घेऊन त्रैलोक्य व्यापले आणि बलीला पाताळलोकी पाठविले व उपशमनात पाडव्यास लोकदर्शनास भूलोकी येण्यासाठी संमती दिली.

पाडव्याच्या शुभ मुहूर्तावर व्यापारी लोक आपल्या व्यवसायाचे नवीन वर्ष सुरू करून वह्यापूजन करतात. तर शालेय विद्यार्थी पाडव्यास 'श्री सरस्वती' पूजन करून विद्यार्जनासाठी प्रार्थना करून वंदन करतात. तद्नंतर कार्तिक द्वितीयेस दिवाळी सणातील भाऊ-बहिणीच्या जिव्हाळ्याच्या नात्यातील प्रेमाची 'भाऊबीज' अत्यंत आनंदात साजरी होते.

दिवाळी सणास अध्यात्मीक दृष्टीने तितकेच महत्त्व आहे. हा सण मांगल्याचे प्रतीक आहे. मनुष्याला जीवनांत आनंद पाहिजे असतो. सुख, समृद्धी व ऐहिक आनंद प्रापंचिकदृष्ट्या जसा महत्त्वाचा आहे, तसाच आपले जे नीज स्वरूप आत्मा आहे, तो मूळचाच आंनदमय आहे. आत्मिक म्हणजेच शाश्वत आनंद मिळणे, आवश्यक असते. त्यासाठी ही संत संगती सहवास यांचे जीवनांत अत्यंत महत्त्व आहे. संत सहवासात जीवाला ईश्वर भक्तीची ओढ लागते. ममुक्षूला सद्गुरूंची भेट होते. दिवाळी दरम्यान संतांची, आपल्या परमसद्गुरूची भेट ही अवर्णनीय पर्वणी होय, म्हणूनच असेही म्हटले जाते, 'साधु संत येती घरा तोची दिवाळी दसरा'.

गुरुदेव दत्तांनी आपल्या 'नृसिंह सरस्वती' अवतारात भीमा-अमरजा नदी संगमी आश्रमी मठात असताना दिवाळी सणास भक्तांच्या विनंतीवरून अष्टरूपे धारण करून, मठात राहून फराळ घेतला व दिवाळी अभीष्टचिंतन करून भक्तांना आशीर्वाद दिल्याचा उल्लेख श्री गुरुचरित्रात येतो.

नवरात्रोत्सव, दसरा, दिवाळी या सणांमधून आपण ईश्वराच्या सगुण अवतार स्वरुपाची पूजा करतो. सर्व सृष्टीचा निर्माता व एकमेव आधार परमात्मा आहे. दैवी प्रकृती मायेतून ईश्वराने सर्वांची निर्मिती केली आहे. भगवंत म्हणतात चरांचरांत व्यष्टी-समष्टी स्वरूपात सर्वांभूती व्यापून आहे. सर्व भूतांत माझा वास आहे. तेव्हा सर्व भूतांवर प्रेम करा. जीवनात आनंदात राहाण्यासाठी प्रपंचात ईश्वरभक्ती आवश्यक आहे. जीवाने मन, बुद्धी, चित्त, अहंकार ही अतःकरणचतुष्टी प्रपंचातून परमार्थाकडे लावली पाहिजे.

**सर्व देवांचा देव आत्मा! आत्मा हा प्रत्येकाच्या हृदयात निवास करतो व तो ध्यानाने प्राप्त होतो.**

दिवाळी सणात असंख्य दीप प्रज्वलीत करून बाह्य अंधार नाहिसा होतो. तद्वत मनातील अज्ञानरूपी तिमिर घालवून ज्ञानरूपी प्रकाशाची ज्योत लावावी. श्रीगुरुचरणी अनन्यभावे शरण जावे. सद्गुरुचरणांची अंतःकरणातून मानसपूजा करावी.

**'ध्यानमूलम् गुर्रुमूर्ती । पूजा मूलम् गुरु पादुका ।**
**मंत्र मूलम् गुरु वाक्यं । मोक्ष मूलम् गुरु कृपा।।'**

दिवाळीचा जीवनातील आनंद द्विगुणीत होऊन सर्वांना ऐहिक सुख-समृद्धीबरोबर ईश्वरभक्तीतून शाश्वत आनंदाची प्राप्ती व्हावी, यासाठी सद्गुरू सांगतात, 'ध्यानातून आत्मचिंतन केल्याने नीज स्वरूप आत्म्याची ओळख होते. आत्मज्ञानाची प्राप्ती होते व जीवाला शाश्वत आत्मानंद मिळतो. सुख समाधान मिळते.'

**ही दीपावली सर्वांना सुख-समृद्धी, आंनदाची जावो.**
**आत्मा मालिक।**

**- बी. के. गायकवाड,**
प्लॉट क्र. ५, नव महाराष्ट्र को. ऑ. हौसिंग सोसायटी,
पुणे-सातारा रोड,
अरण्येश्वर कॉर्नर, पुणे - ४११००९.
मो. नं. ९४०३०२६१६४

***





## दीपावली महापर्व

दीपावली से मानव-जीवन का परिवर्तन की दिशा में अग्रेसर होने के प्रण और संकल्प एक महत्वपूर्ण प्रथा है, मानव जीवन की सबसे बड़ी आवश्यकता है-आध्यात्मिक चेतना का जागरण। बिना आध्यात्म के मनुष्य केवल शरीर और भोगों में उलझा रह जाता है। दीपावली हमें सिखाती है कि जैसे घर की सफाई कर हम दीप जलाने से पहले कचरा निकालते हैं, वैसे ही अपने मन की सफाई करना भी आवश्यक है।

**-नरेश यादव**

**भा**रतीय संस्कृति पर्वों की संस्कृति है। वर्ष भर में जितने पर्व-त्यौहार हमारे देश में मनाए जाते हैं, उतने संसार की किसी अन्य संस्कृति में नहीं मिलते। इन पर्वों के पीछे केवल सामाजिक और सांस्कृतिक ही नहीं, बल्कि गहरी आध्यात्मिक चेतना भी निहित है। दीपावली का पर्व इसी परंपरा का अद्भुत उदाहरण है। यह केवल बाहरी दीपों का पर्व नहीं, बल्कि अंतर्मन के अंधकार को हटाकर आत्मा के प्रकाश को जगाने का पर्व है। भारत की आत्मा उसकी संस्कृति और अध्यात्म में बसती है। यही कारण है कि यहाँ प्रत्येक पर्व केवल उत्सव नहीं होता, बल्कि गहन आध्यात्मिक शिक्षा और जीवन-दर्शन का प्रतीक होता है। दीपावली भी ऐसा ही पर्व है।

दीपावली का वास्तविक अर्थ है-अज्ञान से ज्ञान की ओर, असत्य से सत्य की ओर, मृत्यु से अमरत्व की ओर यात्रा। यही कारण है कि प्राचीन काल से आज तक दीपावली को केवल लौकिक दृष्टि से नहीं, बल्कि आध्यात्मिक आलोक के पर्व के रूप में भी देखा जाता है। यह त्योहार मानव-हृदय में सुप्त पड़ी आध्यात्मिक ऊर्जा को जागृत कर देती है।

बृहदारण्यक उपनिषद का अमर वाक्य-

**असतो मा सद्गमय।**
**तमसो मा ज्योतिर्गमय।**
**मृत्योर्मा अमृतं गमय।।**

(हे प्रभु! असत्य से सत्य की ओर, अंधकार से प्रकाश की ओर, मृत्यु से अमरत्व की ओर हमें ले चलो।)

यही दीपावली का हृदयस्थ संदेश है। यह श्लोक केवल भौतिक अंधकार से प्रकाश की यात्रा नहीं है, बल्कि अज्ञान से ज्ञान, मृत्यु से अमरत्व, असत्य से सत्य की ओर ले जाने वाली साधना है। दीपावली इसी शाश्वत संदेश की याद दिलाती है।

दीप और उसका प्रतीकात्मक अर्थ के रूप में दीपक भारतीय परंपरा में ज्ञान, सत्य और आत्मबोध का प्रतीक माना गया है। जैसे एक दीपक अपने छोटे से प्रकाश से चारों ओर का अंधकार मिटा देता है, वैसे ही आत्मज्ञान का दीप पूरे जीवन के अंधकार को दूर कर देता है।

अंधकार और प्रकाश का आध्यात्मिक विमर्श करें तो मानव जीवन में अंधकार का अर्थ केवल बाहर फैली रात नहीं है। अंधकार वह है जब मनुष्य अपने वास्तविक स्वरूप को भूल जाता है। जब क्रोध, ईर्ष्या, लोभ, मोह, अहंकार और वासना मनुष्य के जीवन पर छा जाते हैं, तो आत्मा का प्रकाश ढक जाता है।

श्रीमद्भगवद्गीता में भगवान श्रीकृष्ण ने कहा है-

**ज्ञानदीपेन भास्वता।**

(ज्ञान का दीप प्रज्वलित होने पर अज्ञान का अंधकार नष्ट हो जाता है।)

इसलिए दीपावली हमें याद दिलाती है कि हमें केवल बाहर दीप जलाने की आवश्यकता नहीं है, बल्कि भीतर भी ज्ञान और आत्मबोध का दीप प्रज्वलित करना है। आध्यात्मिक दृष्टि से अंधकार का अर्थ है-अज्ञान। जब मनुष्य स्वयं को केवल शरीर समझता है और आत्मा को भूल जाता है, वही अज्ञान है। जब लोभ, क्रोध, मोह, वासना और अहंकार मन पर छा जाते हैं, वही अंधकार है।

प्रकाश का अर्थ -आत्मज्ञान। जब मनुष्य अपने वास्तविक स्वरूप को पहचान लेता है कि मैं नश्वर शरीर नहीं, बल्कि शाश्वत आत्मा हूँ, तब प्रकाश उत्पन्न होता है।

दीपावली और आध्यात्मिक साधना की बात करें तो दीपावली के अवसर पर प्राचीनकाल से साधक ध्यान, जप और उपासना में लीन रहते थे। इस दिन को आत्मशुद्धि और आत्मजागरण का श्रेष्ठ अवसर माना गया है।

दीपावली की रात अमावस्या होती है। अमावस्या अंधकार का प्रतीक है। उसी अंधकार में जब दीप जलाया जाता है, तो उसका प्रकाश और भी अधिक प्रखर प्रतीत होता है। यह संकेत है कि जीवन के कठिनतम क्षणों में भी यदि हम आत्मदीप जलाएँ, तो अंधकार कभी स्थायी नहीं रह सकता। दीप अंधकार को खा जाता है। जिस घर में दीप न हो, वह घर नहीं कहलाता। यही संदेश आत्मदीप के लिए भी है-जिस जीवन में आत्मज्ञान का दीप न जले, वह जीवन अधूरा है।

यह पर्व हमें बताता है कि जैसे दीपक अपनी ज्योति स्वयं जलाता है और दूसरों को प्रकाश देता है, दीपक की लौ हमेशा ऊपर उठती है। यह हमें ऊर्ध्वगामी जीवन की प्रेरणा देती है। वैसे ही हमें अपने भीतर आत्मप्रेरणा जगानी चाहिए और समाज को दिशा देनी चाहिए।

दीपावली से मानव-जीवन का परिवर्तन की दिशा में अग्रेसर होने के प्रण और संकल्प एक महत्वपूर्ण प्रथा है, मानव जीवन की सबसे बड़ी आवश्यकता है-आध्यात्मिक चेतना का जागरण। बिना आध्यात्म के मनुष्य केवल शरीर और भोगों में उलझा रह जाता है। दीपावली हमें सिखाती है कि जैसे घर की सफाई कर हम दीप जलाने से पहले कचरा निकालते हैं, वैसे ही अपने मन की सफाई करना भी आवश्यक है।

मन से नकारात्मक भावनाएँ हटाना, द्वेष और ईर्ष्या को समाप्त करना ही वास्तविक 'आंतरिक सफाई' है।

छांदोग्य उपनिषद कहता है-

**आत्मा वा अरे द्रष्टव्यः श्रोतव्यः मन्तव्यः निदिध्यासितव्यः।**

(हे प्रिय! आत्मा का दर्शन, श्रवण, मनन और ध्यान करना चाहिए।)

इस प्रकार दीपावली आत्मा के चिंतन और मनन का श्रेष्ठ अवसर है। या यों कहा जाए दीपावली मानव जीवन को प्रकाशित करने वाला महापर्व है।

दीपावली से मिलने वाली प्रेरणा में कई महत्वपूर्ण बातें है जिसमे कुछ जो इस प्रकार से सार गर्भित की जा सकतीं है

१. असत्य पर सत्य की विजय : जैसे भगवान राम ने रावण का संहार कर धर्म की स्थापना की, वैसे ही हमें अपने भीतर छिपे 'असत्य' का नाश कर 'सत्य' को स्थापित करना चाहिए।

२. अहंकार पर विनम्रता की विजय : दीपक हमेशा नीचे की ओर जलता है, वह ऊँचा होकर भी विनम्र रहता है। हमें भी विनम्रता अपनानी चाहिए।

३. सामाजिक समरसता : दीपावली पर लोग आपसी द्वेष भूलकर एक-दूसरे से मिलते हैं। यह हमें भाईचारे और प्रेम का पाठ सिखाती है।

४. आध्यात्मिक जागरण : इस पर्व का सबसे बड़ा संदेश यही है कि भीतर का दीप जलाएँ, आत्मज्ञान को जगाएँ और जीवन को परमात्मा की ओर ले जाएँ।

५. संत साहित्य भी इसी तरह बोध देता है -जैसे

**कबीर कहते हैं - मोको कहाँ ढूँढे रे बन्दे, मैं तो तेरे पास में।**

**तुलसीदास - जस जस सुरसरि गंग की धारा, सो सतसंगति करै विचारा।**

मंडूक्य उपनिषद का वचन है: आत्मा ही ज्योतिर्मय है। जब आत्मा का बोध होता है, तो सब कुछ आलोकित हो जाता है।

निष्कर्ष के रूप में कहा जा सकता है कि अंतर्मन के दीप जलाएँ दीपावली का वास्तविक उत्सव बाहर के दीपक जलाने में नहीं है, बल्कि अंतर्मन में आत्मबोध के दीप जलाने में है। मानव जीवन का उद्देश्य केवल भौतिक सुख नहीं, बल्कि आत्मसाक्षात्कार है। दीपावली हमें इसी दिव्य मार्ग की ओर प्रेरित करती है। घर, आँगन और नगर को सजाने के साथ यदि हम अपने अंतर्मन को भी सजाएँ, अपनी आत्मा को प्रकाशित करें, तो यही दीपावली का सच्चा उत्सव होगा। कहा गया है:

**दीपो भक्षयते ध्वान्तं कज्जलं च प्रसूयते।**

**यद्गृहे नास्ति दीपस्तु तन्न गृहमिति स्मृतम्।।**

(अर्थ: दीप अंधकार को मिटा देता है और कालिख उत्पन्न करता है। जिस घर में दीप न हो, वह घर नहीं माना जाता। उसी प्रकार जिस जीवन में आत्मदीप न जले, वह जीवन अधूरा है।)

अतः आइए, इस दीपावली पर हम केवल बाहर ही नहीं, भीतर भी दीप जलाएँ और अपने जीवन को ज्ञान, सत्य और आत्मबोध से प्रकाशित करें। यही दीपावली का वास्तविक आध्यात्मिक संदेश है- जागृति और आत्मबोध।।

**|| आत्मा मालिक ||**

**- नरेश यादव,**

आत्मा मालिक परिवार, इंदौर.

***

|| आत्मा मालिक ||



घेऊनी दिव्यांचा प्रकाश सोनेरी,
माळोनी गंध मधुर उटण्याचा...
करा संकल्प सुंदर जगण्याचा,
गाठूनी मुहूर्त दिवाळीच्या सणाचा...

## आपणास व आपल्या परिवारास

# दीपावली

निमित्त

## मंगलमय शुभेच्छा!



• शुभेच्छुक •

## आत्मा मालिक ध्यान योग मिशन,कोकमठाण

आत्मा मालिक ध्यानपीठ, कोकमठाण

✻ प्रेषक ✻

**संपादक, मासिक ॐ गुरुदेव**

**विश्वात्मक जंगली महाराज आश्रम ट्रस्ट, कोकमठाण,**

मु.पो.कोकमठाण (चैतन्यपुरी), शिर्डी-कोपरगांव रोड,

ता. कोपरगांव, जि. अहिल्यानगर (महाराष्ट्र)-४२३६०१